# L. A. BILL No. XXII OF 2021.

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

(१९६५ चा महा. ४०.) (२०२१ चा महा. अध्या. ५.)

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी १५१३—१-(८४५-१२-२०२१)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम १० मधील पोट-कलम (२) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :— (१९६५ चा महा. ४०.)

"परंतु, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभानंतर, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीन पेक्षा अधिक नाहीत इतके परिषद सदस्य निवडून देण्यात येतील, आणि कलम १४ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.". (२०२१ चा महा.)

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. (२०२१ चा महा. अध्या. ५.)

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या तत्कालिन विद्यमान तरतुदींनुसार, नगरपरिषदेच्या प्रत्येक प्रभागातून फक्त एक परिषद सदस्य निवडून देण्यात येत होता. राज्यातील नगरपरिषदांच्या क्षेत्रातील कोविड-१९ साथरोगामुळे उद्‌भवलेल्या आरोग्यविषयक संकटाला तोंड देत असताना, नागरी संस्थांमध्ये बहु-सदस्यीय प्रभाग पद्धती असणे आवश्यक आहे असे वाटले. अशा स्थितीचा आढावा घेतल्यानंतर आणि नगरपरिषदांचे कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने, राज्य शासनास उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये यथोचितरित्या सुधारणा करणे इष्ट वाटले.

२. नगरपरिषदांच्या प्रत्येक प्रभागातून दोन परिषद सदस्य, मात्र तीन पेक्षा अधिक नाहीत इतके परिषद सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले होते. त्या प्रयोजनाकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १० मध्ये यथोचितरित्या सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२१ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२१ (२०२१ चा महा. अध्या. ५), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१.

**एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.

**सन २०२१ चे वि. स. विधेयक क्रमांक २२—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे)**

**(सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०)**

**१.** ते **९.** ** ** **

**१०.** (१) ** ** ** नगरपालिका क्षेत्राची प्रभागांमध्ये विभागांमध्ये विभागणी आणि स्त्रिया, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रभाग राखून ठेवणे.

(२) प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल.

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर, परंतु महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२० याच्या प्रसिद्धीच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीन पेक्षा अधिक नाहीत एवढे परिषद सदस्य निवडून देण्यात येतील, आणि कलम १४ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.

(३) ** ** **

(४) ** ** **

**१०अ व १०अअ.** ** ** **

**११. ते ३५१.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.]**

**[ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई